प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १५.०२.२०२२**

**गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सिडको नवीन गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करणार असल्याच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे सिडकोचे आवाहन**

सिडको महामंडळातर्फे येत्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर नवीन गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येणार असल्याचे काही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त हे निराधार असून, अशाप्रकारच्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. केवळ सिडकोद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीवरच याबाबत नागरिकांनी विश्वास ठेवावा, असे सिडकोकडून कळविण्यात येत आहे.

सिडकोकडून नुकताच २६ जानेवारी २०२२ रोजी नव्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा नोडमध्ये ५,७३० घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मुंबई-पुणे महामार्ग, रेल्वे आणि सिडकोचा मेट्रो प्रकल्प, यांमुळे या नोडला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. एकूण ५,७३० घरांपैकी १,५२४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आणि उर्वरित ४,२०६ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. या योजनेकरिता २४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. या योजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभून आतापर्यंत १० हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.

सिडको महामंडळ सातत्याने आपल्या गृहनिर्माण योजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देत असते. आपल्या नव्याने येणाऱ्या गृहनिर्माण योजनांची माहिती सिडकोकडून जाहिरात व अन्य माध्यमांद्वारे अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येते. यामुळे नागरिकांनी या संदर्भात सिडकोद्वारे प्रसारित करण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके, सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, फेसबुक, युट्यूब आणि ट्विटरवरील सिडकोचे अधिकृत पेज यांद्वारे देण्यात येणाऱ्या माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे. तसेच लवकरच वाणिज्यिक गाळ्यांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात येणार असल्याचेही सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**